# या सत्रकाळातील तसेच १३ व्या विधानसभेच्या कार्यकाळातील कामकाजाचा आढावा.

अध्यक्ष : १३ व्या विधानसभेच्या पाच वर्षांच्या कालावधीतील हे अखेरचे अधिवेशन आहे. तसेच या पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजच्या दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपत आलेले आहे. मी सर्व प्रथम या सत्रकाळातील व त्यानंतर १३ व्या विधानसभेच्या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवत आहे.

या अधिवेशनात एकूण १२ दिवस कामकाज झालेले आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज १०० तास १६ मिनिटे असून कामकाज होऊ न शकलेला कालावधी ३ तास ३७ मिनिटे एवढा आहे. रोजचे सरासरी कामकाज ८ तास २० मिनिटे आहे. या अधिवेशनात आपण अनेक महत्वाच्या विषयांवर विविध आयुधांच्या माध्यमातून विस्तृत चर्चा केलेली असून जनतेच्या अनेक प्रश्नांना यथोचित न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे.

या अधिवेशनात एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ८०२४ आहे. स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ७११ असून सभागृहात ५३ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या ४ असून स्वीकृत झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या शून्य आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या १८९० असून स्वीकृत लक्षवेधी सूचना ८० इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना ४३ आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण २६ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण २४ विधेयके संमत केली.

अर्धातास चर्चेच्या एकूण १७३ सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ६८ स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात ३ अर्धातास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झाली.

या अधिवेशनात ४ अशासकीय विधेयकांवर चर्चा झाली.

प्राप्त अशासकीय ठरावांची संख्या ३७२ असून मान्य सूचनांची संख्या २५१ आहे व चर्चा झालेल्या सूचनांची संख्या १ आहे.

नियम २९३ अन्वये ४ प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

एका शासकीय ठरावावर चर्चा झाली.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ७८.६४ टक्के इतकी होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती ८८.९३ टक्के तर कमीतकमी उपस्थिती ४१.९७ टक्के एवढी होती.

आता आपण १३ व्या विधानसभेच्या एकूण कामकाजाकडे वळू या.

१३ वी विधानसभा दिनांक २१ ऑक्टोबर २०१४ रोजी गठित झाली.

त्यानंतर सभागृहाची पहिली बैठक दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी घेण्यात आली. त्या दिवसापासून आजपर्यंत एकूण १८ अधिवेशने झाली असून सभागृहाच्या एकूण २२१ बैठका झालेल्या आहेत. गेल्या ५ वर्षाचे सभागृहाचे प्रत्यक्षात झालेले सरासरी कामकाज ७ तास आहे. अनेक वेळा रात्री उशिरापर्यंत बसून कामकाज पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०१४ ते २०१९ या १३ व्या विधानसभेच्या कार्यकाळात श्री. आर. आर. पाटील, माजी उप मुख्यमंत्री, श्री शिवाजीराव देशमुख, माजी सभापती, श्री. पांडुरंग उर्फ भाऊसाहेब पुंडलिक फंडकर, मंत्री, डॉ. पतंगराव कदम, माजी मंत्री, सर्वश्री, प्रकाश (बाळा) सावंत, कृष्णा अर्जुन घोडा, हनुमंत जगन्नाथ डोळस या विद्यमान सदस्यांचे तसेच भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी, माजी पंतप्रधान, श्री. ए.आर. अंतुले माजी मुख्यमंत्री, सर्वश्री मोहम्मद फजल, रा. सु. गवई, ओम प्रकाश मेहरा, राम कापसे, डॉ. सय्यद अहमद, माजी राज्यपाल, प्रा. नारायण सदाशिव फरांदे, माजी सभापती, श्री प्रमोद शेंडे, माजी उपाध्यक्ष, श्री.वसंत डावखरे, माजी उप सभापती, श्री निहाल अहमद, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, कॉम्रेड माधवराव गायकवाड, विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद तसेच शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी या मान्यवरांचे निधन झाले. या सर्वांनाच अत्यंत जड अंतकरणाने आपण भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. या घटना मनाला चटका लावणाऱ्या होत्या.

संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये "प्रश्न" या आयुधाचे एक अनन्य साधारण महत्व आहे. याचा मूळ उद्देशच शासनाकडून प्रश्नाची सोडवणूक करुन घेण्याच्या दृष्टीने माहिती घेणे हा आहे. या महत्वाच्या आयुधाच्या माध्यमातून गत ५ वर्षात सभागृहात एकूण १३९६२३ तारांकित प्रश्न विधिमंडळ सचिवालयाकडे प्राप्त झाले. त्यातील ११५७५ तारांकित प्रश्न स्वीकृत करण्यात आले व एकूण ८५३ प्रश्नांची सभागृहात तोंडी उत्तरे झालेली आहेत. प्रश्न या आयुधाच्या माध्यमातून सभागृहात गत ५ वर्षात अनेक महत्वाचे विषय या व्यासपीठावरुन निर्णयाप्रत आलेले आहेत.

सभागृहाच्या व्यासपीठावरुन जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी "लक्षवेधी सूचना" हे देखील अत्यंत महत्वाचे आयुध आहे. या आयुधाच्या माध्यमातून १३ व्या विधानसभेत एकूण ३७११६ सूचना प्राप्त झाल्या व त्यातील १५३२ लक्षवेधी सूचना स्वीकृत झाल्या. त्यापैकी ५८९ सूचनांवर सभागृहात विस्तृत चर्चा झाली आहे.

गत ५ वर्षात "स्थगन प्रस्ताव" सारख्या अत्यंत महत्वाच्या परंतु संवेदनशील आयुधाच्या माध्यमातून एकूण १६०३ सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी १ स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकृत करण्यात आली असून त्यावर चर्चा देखील झाली आहे.

गत ५ वर्षात म.वि.स. नियम २९३ अन्वये सत्ताधारी व विरोधी पक्षातर्फे एकूण ५४ प्रस्तावांवर विस्तृत चर्चा झाली आहे. तसेच, विरोधी पक्षातर्फे एकूण १२ अंतिम आठवडा प्रस्तावांवर विस्तृत चर्चा झाली आहे.

विधिमंडळाचे मूळ काम कायदे संमत करणे हे आहे. गत ५ वर्षात सभागृहाने २६८ "विधेयके" संमत केलेली आहेत. त्याच प्रमाणे, एकूण ५२४१ "अशासकीय ठराव" प्राप्त झाले असून ३०८४ अशासकीय ठराव स्वीकृत करण्यात आले व १२ अशासकीय ठरावांवर सभागृहात विस्तृत चर्चा झाली.

गत ५ वर्षात म.वि.स. नियम ११० अन्वये ८ शासकीय ठराव प्राप्त झाले असून त्यावर चर्चा झाली आहे. तसेच, म.वि.स. नियम ९४ अन्वये एकूण ३०९८ अर्धा तास चर्चेच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ९७८ सूचना स्वीकृत असून ७५ सूचनांवर चर्चा झाली आहे. त्याच प्रमाणे, म.वि.स. नियम १०१ अन्वये एकूण ८४ अल्पकालीन चर्चेच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी १२ अल्पकालीन सूचना स्वीकृत झाल्या असून ३ सूचनांवर चर्चा झाली आहे.

१३ व्या विधानसभेच्या कार्यकाळात सभागृह सुरळीतपणे चालविण्यासाठी आपण सर्वांनी मला जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो. विशेषत: मा.मुख्यमंत्री, मा.उपाध्यक्ष, संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय मुख्य प्रतोद, प्रतोद, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी, मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

------